महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# जाहीर निवेदन

अधीक्षक अभियंता, महावितरण कार्यालय, ग्रामीण मंडळ छत्रपती संभाजीनगर प्लांट क्र. जे-१३, गरवारे स्टेडियम समोर, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर या आस्थापनेवर सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार, छत्रपती संभाजीनगर यांच्या सर्वेक्षण अहवालानुसार सन २०२४-२५ करिता प्रशिक्षणासाठी शिकाऊ उमेदवारांच्या विजतंत्री - ४५. तारतंत्री-४५, एकुण ९० जागा भरण्यासाटी विजतंत्री/तारतंत्री या व्यवसायात आय. टी. आय. उत्तीर्ण झालेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मार्गाविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पात्र उमेदवारांनी दिनांक २७.१२.२०२४ ते दिनांक ०९.०१.२०२५ सायं ५:३० वाजेपर्यंत www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर आस्थापना क्र. E03182700117 वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. दिनांक ०९.०१.२०२५ नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. टिप : अर्ज करावयाची शेवटची तारीख दिनांक ०९.०१.२०२५ रोजी सायं ०५:३० पर्यंतची राहील. उमेदवाराने www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर भरती ही फक्त छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांसाठी असून इतर जिल्हयातील उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी सर्व संबंधीत कागदपत्रांची (शैक्षणिक प्रमाणपत्र आयटीआय गुणपत्रक व सनद, एसएससी सनद, जातीचा दाखला, आधारकार्ड, रहिवाशी दाखला ई.) साक्षांकीत छायांकित प्रत दिनांक ०९.०१.२०२५ पर्यंत महावितरण मंडळ कार्यालय ग्रामीण छत्रपती संभाजीनगर, प्लॉट क्र. जे-१३, गरवारे स्टेडियम समोर, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष सादर करावी. तसेच शैक्षणिक व इतर कागदपत्रांची साक्षांकीत छायांकित प्रत सादर न करणाऱ्या उमेदवाराच्या ऑनलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही, तसेच प्रशिक्षण कालावधी एक वर्षाचा राहील. निवड झालेल्या शिकाऊ उमेदवारास प्रशिक्षण कालावधीत नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येईल. शिकाऊ उमेदवार भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना राहील.

स्वा./-
अधीक्षक अभियंता,
महावितरण ग्रामीण मंडळ, छत्रपती संभाजीनगर

पीआरओ क्र. १५३